ISSN 2230-7850 Impact Factor : 4.1625(UIF) Volume - 6 | Issue - 9 | October - 2016

Indian Streams Research Journal

# यशवंतराव चव्हाण - विकेंद्रीकरण

मल्लिनाथ ब.अंजुनगीकर
लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालय, सोलापूर.



**प्रस्तावना :**

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास यशवंतराव चव्हाण यांच्याशिवाय कधीच पूर्ण होऊ शकत नाही. एकाच व्यक्तीच्या जीवनाचे आणि कार्यकर्तुत्वाचे परिणाम साऱ्या महाराष्ट्रात व्हावे हेच त्यांच्या व्यक्तिमत्वाचे मोठेपण दर्शविते. शेती , सहकार, अर्थकारण, समाजकारण, राजकारण , साहित्य संस्कृती या सर्वच क्षेत्रातील त्यांचा वावर, त्यांचे कर्तुत्व खूप मोठे आहे. एक प्रज्ञावान नेता, प्रगल्भ अर्थतज्ञ, कुशल प्रशासक, खंबीर संरक्षणमंत्री, बहुजन समाजाचा तसेच सर्वांगिण विकासाचा ध्यास घेतलेले व्यक्तिमत्व अशा अनेक बिरुदानी त्यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व स्पष्ट होते.

खरा भारत खेड्यातच आहे आणि तो सक्षम करण्यासाठी विकेंद्रीकरणाची मोठी आवश्यकता आहे असे महात्मा गांधी यांचे मत होते. भारतामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच पंचायतीच्या पध्दतीची राज्यव्यस्था अस्तित्वात होती . मात्र या व्यवस्थेला आकार प्राप्त झाला तो स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच. महात्मा गांधीजीचे ग्रामस्वराज्याचे स्वप्न साकार करण्यासाठी भारतीय राज्यघटनेच्या कलम ४० नुसार ग्रामपंचायती स्थापन करण्याचे अधिकार घटकराज्य सरकारकडे देण्यात आले . देश आणि राज्यपातळीवर ज्या पध्दतीने विकासाची कामे केली जातात ज्यानुसार ध्येय धोरणे ठरविली जातात त्याच पध्दतीने गांव, तालुका आणि जिल्हा पातळीवर यंत्रणा उभी करता आली तर त्यामध्ये जनतेचा जास्तीत जास्त सहभाग वाढून सत्तेच्या विकेंद्रीकरणाची प्रक्रिया सबळ होईल. या भुमिकेतून पंचायतराज्य पध्दतीचा उगम झाला.

पंचायतराज्य व्यवस्थेला लोकशाहीचे राजकीय प्रशिक्षण केंद्र मानले जाते. लोकशाही शासन व्यवस्थेचा 'लोक' हा आत्मा असतो. यात लोक सार्वभौम असतात आणि त्यांचा लोकशाही जीवन प्रणालीमध्ये प्रत्येक निर्णय प्रक्रियेमध्ये सहभाग असणे अत्यंत महत्वाचे असते. पंचयात राज्य व्यवस्था ग्रामीण भागाचा विकास होण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. ती एक केवळ प्रशासकीय स्वरुपाची सुधारणा नसून व्यवस्था परिवर्तनाचा उपक्रम आहे हे यशवंतराव चव्हाणांनी ओळखले होते. ग्रामीण विकासाचा विचार करीत असताना केवळ राजकीय परिवर्तन महत्वाचे नाही तर सामाजिक व आर्थिक विकासही महत्वाचा आहे असे यशवंतराव चव्हाण यांचे मत होते. त्या दृष्टीने त्यांनी विक्रेंद्रीकरणाचा विचार केला.

बलवंतराय मेहता समितीने लोकशाही विक्रेंद्रीकरणाचा पुरस्कार केल्यानंतर अनेक राज्यात पंचायतराज निर्माण करण्यात आले. महाराष्ट्रातील यशवंतराव चव्हाण यांनी येथील स्थानिक परिस्थितीच्या संदर्भात बलवंतराय समितीच्या शिफारशींचे कशा रितीने अंमलबजावणी करता येईल याचा अभ्यास करण्यासाठी १९६० मध्ये वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली . या समितीने आपला अहवाल

१९६१ मध्ये राज्य सरकारला सादर केला त्याच्या आधारे १९६१ मध्ये 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम ' संमत करण्यात आला. १ मे १९६२ पासून या अधिनियमाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झाली. महाराष्ट्रात त्रिस्तरीय पध्दतीचा अवलंब करुन जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद , तालुका पातळीवर पंचायत समिती आणि ग्राम पातळीवर ग्रामपंायत अशी स्थापना करण्यात आली. वसंतराव नाईक समितीने जिल्हा हा कार्याचा घटक करावा असे सुचविले. मात्र मेहता समितीने जिल्हा हा कार्याचा घटक करु नये पंचायत समिती हाच कार्याचा घटक मानावा असे सुचविले होते. मात्र महाराष्ट्र शासनाने जिल्हा हाच कार्याचा घटक मानून पंचायतराज्याचा प्रयोग सुरु केला आणि काहीशी मिश्र पध्दती स्विकारुन जिल्हा परिषद या घटकाला अधिक महत्व दिले.

महाराष्ट्रातील पंचायत राज्य व्यवस्थेचे एक महत्वाचे वैशिष्ट्य असे की, या व्यवस्थेचे कार्यक्षेत्र फक्त राज्याच्या ग्रामीण विभागापुरते मर्यादित आहे. राज्यातील नागरिक विभाग तिच्या कार्यक्षेत्रातून पूर्णपणे वगळलेला आहे. नागरी विभागासाठी वेगळ्या स्थानिक स्वराज्य संस्थाची निर्मिती करण्यात आली आहे. यशवंतराव चव्हाणांच्या मार्गदर्शनातूनच ती निर्मिती घडून आली. त्यांचे हे देशातील एकमेव धोरण होते. पुढे कृषि औद्योगिक धोरणाला या संस्था पुरक ठरल्या त्यामुळे महाराष्ट्र बऱ्याच प्रमाणात सुजलाम सुफलाम झाला.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील पंचायत राज्य संस्थाच्या कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी वेळोवेळी समित्या नियुक्त केल्या. इ.स. १९७० मध्ये ल.ना.बोंगीरवार समिती, १९८० मध्ये ग्रामविकास मंत्री बाबूराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती, १९८४ मध्ये प्रा.पी.बी.पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. पंचायत राज्य संस्थाच्या कारभारात सुधारणा करण्यासाठी आणि त्यांना अधिक समक्ष व कार्यक्षम बनविण्यासाठी या समित्यांनी अनेक उपयुक्त सुचना शासनाला केल्या. पंचायतराज्याच्या कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी केंद्र सरकारनेही पुढाकार घेतला होता. १९६० मध्ये व्ही.टी.कृष्णम्माचारी समिती , १९६६ मध्ये तखमल जैन समिती, १९७७ मध्ये अशोक मेहता समिती अशा समित्या केंद्रसरकारने नेमल्या. त्यातूनच पंचायत राज्यव्यवस्थेचा समावेश भारताच्या राज्यघटनेत करावा आणि त्यास घटनात्मक दर्जा देण्यात यावा असा विचार पुढे आला. तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी त्यास मान्यता दिली. पी.व्ही.नरसिंहाराव पंतप्रधान असताना भारताच्या राज्य घटनेत ७३ वी आणि ७४ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. १९९३ मध्ये त्यास राष्ट्रपतीने संमती दिली. अशा रितीने पंचायत राज्य व्यवस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला . ७३ व्या घटना दुरुस्तीने पंचायत राज्य संस्थेस, तर ७४ व्या घटना दुरुस्तीने नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना घटनात्मक दर्जा प्राप्त करुन दिला. महाराष्ट्रात ३३ जिल्हा परिषदा, ३४३ पंचायत समित्या आणि २७५९८ ग्रामपंचयाती निर्माण करण्यात आलेल्या आहेत.

यशवंतराव चव्हाणांनी पंचायत राज्य व्यवस्थेचा जो मोठा पुरस्कार केला त्यामुळे महाराष्ट्राची सर्वांगिण प्रगती घडून आली. सहकार क्षेत्राच्या व्यवस्थापनात ग्रामीण माणसाला स्थान मिळाले. सहकारी संस्थाचे सदस्य, संचालक, चेअरमन जिल्हा परिषदा , पंचायत समिती यामधील सदस्यांच्या रुपाने ग्रामीण नेतृत्व उदयास आले. यशवंतराव चव्हाणांनी कृषी , औद्योगिक, सहकार या क्षेत्रात ज्या धोरणांचा पुरस्कार केला त्यामुळे ग्रामीणच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचा चेहरा मोहरा बदलला. सत्तेच्या विक्रेंद्रीकरणामुळे सव लहान मोठ्या जातीवर्गाला घेऊन, दलित बहुजन , पिडीत समाज यांच्या विश्वास निर्माण करुन त्यांना सत्तेच्या प्रवाहात आणण्याचे महत्वपूर्ण कार्य यशवंतराव चव्हाण यानी केले. अर्थरचना, कार्यक्षम प्रशासन व शिक्षणाचा प्रसार हे तीनही प्रश्न मूलभूत पध्दतीने हाताळून त्यांनी ग्रामीण महाराष्ट्रात अमूलाग्र बदल घडवून आणला याबरोबरच त्यांनी क्रिडा, साहित्य, संगीत, नाट्य, कला इत्यादी क्षेत्रातही मोठ योगदान दिले. महाराष्ट्राच्या इतिहासात सुसंस्कृत राजकारणी, वैचारिक वसा जपणारा नेता म्हणूनही त्यांना ओळखले जाते.

यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रात जी पंचायतराज पध्दती सुरु केली त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाला मोठी गती प्राप्त झाली. स्थानिक स्वराज्य संस्थाना दिलेल्या बळकटीमुळे ग्रामपातळीवर आर्थिक, राजकीय, शैक्षणिक असे उपक्रम सुरु झाले. शेती उत्पादनांना लघु उद्योगधंद्याना चालना मिळाली. महाराष्ट्रातील जनतेनेही या पंचायत राज्याच्या प्रयोगाला मोठे सहकार्य दिले. त्यामुळे महाराष्ट्रात पंचयात राज्य व्यवस्थेचा प्रयोग खऱ्या अर्थाने यशस्वी झाला आणि देशात महाराष्ट्र एक आघाडीचे आणि प्रगतशील राज्य म्हणून पुढे आले. या पंचायत राज्यव्यवस्थेत काही उणीवाही आहेत. मात्र त्याही हळूहळू दूर होतील अशा रितीने नवमहाराष्ट्राचा खरा पाया यशवंतराव चव्हाण यांनी रचला असे निसंदीग्धपणे म्हणता येते.

## संदर्भ :


१) उत्तम कांबळे ( सं) , यशवंतराव चव्हाण महाराष्ट्राचे शिल्पकार, सकाळ प्रकाशन, पुणे २००२.
२) विठ्ठलराव पाटील, यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व, कराड २००२.
३) पन्नालाल सुराणा , प्रा.नानासाहेब लिगाडे (सं.), झेपावणारा ग्रामीण महाराष्ट्र, भाई जगन्नाथराव लिगाडे चॅरिटेबल ट्रस्ट, सांगोला, सोलापूर,२००८.
४) प्रा.बी.बी.पाटील, महाराष्ट्र शासन आणि राजकारण, फडके प्रकाशन, कोल्हापूर २००५.
५) डॉ.भालवा विभुते, ग्रामपंचायत प्रशासन-तोंड ओळख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-२००८.
६) महीपाल, पंचायती राज, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, नवी दिल्ली-२००४.